**ARTHA**
( Fortnightly )
**Poona 4**
Tel. 55627

# अर्थ

**LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT**
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वष ३८ | पुणे, बुधवार, २ फेब्रुवारी, १९७२ | अंक ३

## तुमच्या उफाळणाऱ्यां जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवं तसं मुक्तपणे भटकणाऱ्यासाठी ठाकरसीचं मोकळं मोकळं वाटणारं सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, केम्ब्रिक्स—कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

**ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेरिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.**

TF **ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राउन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

Madison/TGM/7 Mar

## "हिंदू एकत्र कुटुंबा" त जैनांचाही समावेश होतो
### ( सुप्रीम कोर्टाचा निवाडा )

एका जैन कुटुंबावर, त्याला हिंदू अविभक्त कुटुंबाचा दर्जा देऊन, संपत्तीकराची आकारणी करण्यात आली. अपेलेट ट्रायब्यूनलने "जैन हे हिंदू नाहीत, तेव्हा तिसऱ्या कलमातील 'हिंदू अविभक्त कुटुंब' ह्या व्याख्येत जैन कुटुंब बसत नाही" असे ठरवून संपत्ती कराची आकारणी रद्द केली. कमिशनर ऑफ वेल्थ टॅक्सने कलकत्ता हायकोर्टाकडे अर्ज करून निर्णय विचारला. "सर्वसाधारण अर्थाने जैन हे हिंदू नसल्यामुळे त्यांचे "हिंदू अविभक्त कुटुंब" होऊ शकत नाही असे म्हणून हायकोर्टाने करदात्याच्या बाजूने मत दिले. ह्यावरचे अपील सुप्रीम कोर्टाच्या डिव्हिजन बेंचपुढे चालले.

"ज्याप्रमाणे मुंबईचे खोजे आणि कच्छी मेमन, त्याचप्रमाणे गुजरातचे सुन्नी बोहरा ह्यांना वारसाच्या बाबतीत हिंदू कायदा लागू आहे म्हणून त्यांना हिंदू गणता येत नाही, त्याचप्रमाणे जैनांना हिंदू कायदा ( रिवाजाने बदललेला ) लागू पडला तरी ते हिंदू बनत नाहीत. जैन इतिहासकारांनी आणि लेखकांनी जैन मूळ हिंदूच होते, ह्या मतास तीव्र विरोध दर्शविला आहे. हिंदू आणि जैन हे वेगळे आहेत असे ते म्हणत आहेत आणि जैनांचे स्वतंत्र कायदे-कानू आहेत असेही ती सांगतात. परंतु ते कायदे-कानू कोर्टाच्या नजरेस आणण्यात आलेले नाहीत. दि हिंदू मॅरेजेस ॲक्ट, १९५५, दि हिंदू सक्सेशन ॲक्ट, १९५६, दि हिंदू मायनॉरिटी ॲंड गार्डियनशिप ॲक्ट, १९५६ आणि दि हिंदू अॅडॉप्शन ॲंड मेन्टेनन्स ॲक्ट, १९५६ हे कायदे होईपर्यंत जैनांना हिंदू कायदा (रिवाजाप्रमाणे बदललेला) लागू होता, हे निर्विवाद आहे; जैन अविभक्त कुटुंब हे हिंदू अविभक्त कुटुंबच त्याला अनुषंगिक परिणामांच्या दृष्टीने होते. कायद्यानुसार "हिंदू" शब्दात जैनांचा समावेश होई. जैन आणि हिंदू धर्म अगदी अलग असले तरी कायद्याच्या तरतुदीत हिंदूमध्ये जैन समाविष्ट आहेत; विवाह, वारसा, अज्ञानावस्था, पोटगी, ह्याबाबतीत हिंदूप्रमाणेच कायदे जैनांना लागू आहेत. तेव्हा, 'हिंदू अविभक्त कुटुंब' ह्या संज्ञेत 'जैन अविभक्त कुटुंब' नक्कीच गणले जायला हवे. 'हिंदू अविभक्त कुटुंब' ह्या शब्दांना विशिष्ट कायदेशीर अर्थ आहे आणि ते शब्द करविषयक कायद्यात वापरलेले आहेत. 'हिंदू एकत्र कुटुंब' ह्याचा अर्थ त्यात अभिप्रेत आहे." असा सुप्रीम कोर्टाने निवाडा केला.

---

### ऑडिटचे राष्ट्रीयीकरण ?

ऑडिटच्या कामाचे राष्ट्रीयीकरण करण्याचा विचार चालू आहे. ह्या प्रश्नाचा अभ्यास अर्थ खाते, कंपनी कारभार खाते, उद्योग संवर्धन खाते, ही तीन खाती स्वतंत्रपणे करीत आहेत. ऑडिटच्या कामाचे काही ऑडिट फर्म्समध्येच केंद्रीकरण होऊ नये, ह्यासाठी अर्थखाते आजही प्रयत्नशील आहे.

### मुदतीपूर्वी ठेवी परत घेतल्या तर–

बिगर-बँकिंग, बिगर-फिनॅन्शिअल कंपन्या ठेवीदारांची गरज भागविण्यासाठी त्यांच्या ठेवींची मुदत संपण्यापूर्वीही ठेवी परत करतात. त्यावेळी त्या ठेवीवर व्याज किती द्यावे, हे रिझर्व्ह बँकेने ठरवून दिले आहे. १ जानेवारी १९७२ नंतर कोणत्याही अशा कंपनीने परतफेडीच्या ठरलेल्या तारखेचे पूर्वी परंतु ठेवीच्या तारखेनंतर १२ महिन्यांनी ठेव परत केल्यास कंपनीने ठरलेला व्याजाचा दर वजा एक टक्का ह्यापेक्षा जास्त दराने व्याज देता कामा नये. मुदतीपूर्वी परत केलेल्या कोणत्याही ठेवीवर खालील कोष्टकात नमूद केल्यापेक्षा जास्त दराने व्याज देता कामा नये.

| | परवानगी असलेला कमाल व्याज दर % |
|---|---|
| ठेवीच्या तारखेपासून १४ दिवसात ठेव परत केल्यास | ० |
| १४ ते १५ दिवसांत | १ |
| ४५ ते ९० दिवसांत | २ |
| ९० ते ६ महिन्यांत | ३–१/४ |
| ६ ते ९ महिन्यांत | ३–३/४ |
| ९ ते १२ महिन्यांत | ४–१ ४ |

ज्या ठेवींच्या कराराप्रमाणे कंपनीला स्वतःच्या इच्छेप्रमाणे मुदतीपूर्वी ठेव परत करण्याचा अधिकार आहे, तेथे वरील कोष्टक लागू नाही.

### बांगला देशाच्या स्वतःच्या चलनी नोटा लवकरच सुरू होणार

बांगला देशाची मध्यवर्ती बँक, दि बँक ऑफ बांगला देश स्वतःचे चलन लवकरच प्रसृत करील. सध्या पाक चलन तेथे कायदेशीर चलन आहे. त्याबरोबर हिंदी चलनही तेथे चालते, आणि पाक नोटांपेक्षा हिंदी नोटाच लोक अधिक पसंत करतात. चलनाची ही गुंतागुंत सोडविण्यासाठी बांगला देश सरकारने भारत सरकारकडे एका चलन आणि परदेशी हुंडणावळ तज्ज्ञाची मागणी केली, तिला अनुसरून रिझर्व्ह बँकेचे कंट्रोलर ऑफ फॉरिन एक्सचेंज श्री. रामप्रसाद चतर्जी यांची तिकडे रवानगी करण्यात आली आहे. बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा आवामी लीगचा उद्देश जवळजवळ सफल झालाच आहे, कारण दोन सोडून बाकी सर्व बँकांच्या मुख्य कचेऱ्या पाकिस्तानात आहेत.

---

### सरकार सोन्याची आयात करणार

सोन्याचे दागिने निर्गत करणारांना आंतरराष्ट्रीय किमतीस सोने पुरविण्यासाठी सरकार सोने आयात करणार आहे. दि हॅंडिक्राफ्ट्स ॲंड हॅंडलूम एक्स्पोर्ट कॉर्पोरेशनकडे आयातीचे काम सोपविले जाईल. १९६८–६९ मध्ये ७५ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने निर्गत झाले होते; ती निर्गत १९७०–७१ मध्ये १९·४० लक्ष रुपयांवर रोडावली.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, २ फेब्रुवारी, १९७२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


“अर्थ एव प्रधान:” इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## कंपन्यांकडील ठेवींवरील बंधनावर टीका

बिगर बँकिंग कंपन्या ठेवी घेतात त्यावर रिझर्व्ह बँकेने नवीन निर्बंध घातले आहेत. त्यापूर्वी अंमलात असलेल्या निर्बंधापेक्षा हे निर्बंध अधिक कडक आहेत. कलकत्ता येथील भारत चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेने रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांकडे एक निवेदन पाठवून ह्यासंबंधी नाराजी व्यक्त केली आहे. ह्या निर्बंधामुळे बिगर बँकिंग कंपन्यांना मिळू शकणाऱ्या ठेवींच्या पैशावर वाईट परिणाम होईल असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनात अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे की कंपन्यांच्या औद्योगिक व व्यापारी व्यवहारांच्या मर्यादा त्यामुळे आकसत जातील. कंपन्यांना मिळणाऱ्या कर्जाऊ रकमावर सुद्धा जास्तीत जास्त मर्यादा घालण्यात आलेली आहे. अशा कर्जाऊ रकमांना अनेकदा कंपनीच्या डायरेक्टरांकडून, किंवा पूर्वीच्या मॅनेजिंग एजंट्सकडून किंवा सेक्रेटरी, ट्रेझरर्स आणि भागधारक ह्यांच्याकडून हमी देण्यात येत असते. तरीसुद्धा कर्जाऊ रकमांवर निर्बंध घालण्यात आलेले आहेत. म्हणून कंपन्यांना बँकांकडून अधिक प्रमाणात हुकमी पैसे मिळण्याची व्यवस्था जोपर्यंत होत नाही तोपर्यंत सध्याच्या परिस्थितीत बदल करण्यात येऊ नये. कंपन्यांना तारणाशिवाय मिळणाऱ्या ठेवींच्या पुरवठ्याचा नीट व सखोल अभ्यास करण्यात आल्यावरच ह्याविषयी निर्णय घेण्यात यावा. कारण, बँकांकडून मिळणाऱ्या पैशावर निर्बंध येत चालल्याने बऱ्याच खाजगी व सार्वजनिक भांडवलांच्या कंपन्या लोकांकडून मिळणाऱ्या ठेवींवर अवलंबून राहू लागल्या आहेत. बँकांकडून पैसा मिळण्यातील अडचणी आणि ठेवींवर घालण्यात येत असलेले निर्बंध ह्यांच्या कात्रीत सापडून अनेक व्यापारी व औद्योगिक कंपन्यांना आपले व्यवहार बंद करावे लागण्याचा संभव आहे असा इषारा निवेदनात शेवटी देण्यात आला आहे.

---

## खनिज तेलाच्या आयातीवरील वाढता खर्च

हिंदमधील तेलशुद्धीच्या कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढविण्यात येणार आहे. सध्या कारखान्यांतून २ कोटी टन अशुद्ध तेल शुद्ध करण्याची व्यवस्था आहे. तीत वाढ झाल्यावर २·६ कोटी टन तेलाचे शुद्धीकरण करण्यात येऊ लागेल. ह्याचा एक चांगला परिणाम असा होईल की पेट्रोलपासून तयार करण्यात येणाऱ्या पदार्थांच्या बाबतीत भारत जवळजवळ स्वयंपूर्ण होईल. परंतु त्याच बरोबर आयात तेलाच्या किंमतीत झालेल्या व होऊ घातलेल्या वाढीमुळे देशाला बराच खर्च करावा लागेल. सध्या भारतामधील अशुद्ध तेलाचे उत्पादन १·२ कोटी टनांच्या जवळ-पास आहे. अधिक लागणारे तेल परदेशातून आयात करावे लागते. ही आयात मुख्यत: इराणकडून करण्यात येत असते. इराणने अलीकडेच अशुद्ध तेलाची किंमत कमी करण्याचे नाकारले आहे. त्यामुळे भारताला सुमारे २० कोटी डॉलर्स अधिक द्यावे लागणार आहेत. नॅशनल इराणिअन ऑईल कंपनीशी तेलाच्या आयातीबद्दल जो करार करण्यात आला आहे त्याप्रमाणे भारताला ४ कोटी टन तेलाची आयात करावी लागते. इराणी कंपनीच्या तेलाच्या किंमती आणि इराणच्या आखातामधील तेलाच्या व्यापारी किंमती ह्यांचा मात्र फारसा संबंध नाही. कंपनीच्या तेलाच्या किंमती तेलकंपन्यांच्या गटांकडून ठरविल्या जातात. गेल्या फेब्रुआरी महिन्यात झालेल्या कराराप्रमाणे कंपनीने तेलाच्या किंमतीत प्रत्येक पिपामागे ४० सेंट एकदम वाढविले. येत्या जून महिन्यापासून किंमतीत आणखी १० टक्क्यांनी वाढ होईल. त्याशिवाय येत्या पाच वर्षात मधूनमधून किंमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. ह्या परिस्थितीला तोंड देत राहण्यापलीकडे भारत काही करू शकत नाही. कारण अजूनही अशुद्ध तेलाचा पुरेसा साठा देशात उपलब्ध नाही.

---

## संयुक्त राष्ट्रसंघटनेजवळ अपुरा पैसा

संयुक्त राष्ट्रसंघटनेचे नवे सरचिटणीस मि. कर्ट वाल्डहाइम ह्यांनी संघटनेजवळ पुरेसा पैसा नसल्याचे जाहीर केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जून १९७२ पर्यंत संघटनेचा रोजचा खर्च चालविण्यास पुरेल इतकाही पैसा शिल्लक नाही. तोपर्यंत संघटनेच्या खर्चाची काही तरी तरतूद करण्यात आली नाही तर सुमारे २·४ कोटी डॉलर्स अथवा १७·५ कोटी रुपयांची तूट सोसावी लागेल. संघटनेच्या नोकर वर्गाला काटकसर करण्याची सूचना त्यांनी दिली आहे. सुमारे ६० लाख डॉलर्स अथवा ४·५ कोटी रुपयांची बचत करणे शक्य आहे असे त्यांना वाटते. त्याशिवाय संघटनेच्या सभासदांनी २ कोटी डॉलर्स अथवा ४४·६ कोटी रुपये बिनव्याजी आदा करावे असेही त्यांनी सुचविले आहे. ह्यापैकी काही रकमा पुढे रुजू होणाऱ्या वर्गणी-पोटी आणि काही १९७५ पर्यंत न मागण्याच्या अटीवर द्याव्या असे सुचविण्यात आले आहे.

---

## आय. सी. एस्. अधिकाऱ्यांना पौंडात पेन्शन मिळण्याचा हक्क नाही

सेवानिवृत्त आय. सी. एस्. अधिकाऱ्यांना त्यांचे निवृत्तीवेतन पौंडाच्या चलनात घेण्याचा हक्क आहे किंवा नाही असा प्रश्न दिल्ली येथील हायकोर्टात उपस्थित करण्यात आला होता. दोघा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी आपणांस असा हक्क आहे असा दावा कोर्टात केला होता. त्यांच्या अर्जाचा निकाल मूळ कोर्टाने देऊन त्यांना असा हक्क आहे असा निर्णय दिला होता. त्यावर भारत सरकारने दिल्ली हायकोर्टात अपील दाखल केले होते. अपील हायकोर्ट बेंचपुढे चालून पौंडात पेन्शन मिळण्याचा हक्क सेवानिवृत्त आय. सी. एस्. अधिकाऱ्यांना नाही असा निकाल देण्यात आला. बेंचात तीन हायकोर्ट जज्ज होते. निकालपत्रकात ह्या विषयासंबंधी करण्यात आलेला युक्तीवाद असा की कोणत्याही स्वतंत्र सरकारवर, आपल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना पेन्शन देताना ते परदेशात व परदेशीय चलनात देण्याचे बंधन आहे अशी कल्पनाही करता येणे अशक्य आहे. एकतर अशी गोष्ट कधीही करण्यात येत नाही. कारण परदेशीय चलनाचा अशा रीतीने खर्च करणे अन्याय आहे. शिवाय ही प्रथा कोणत्याही राष्ट्रीय सरकारच्या स्वाभिमानाला खाली मान घालण्यास लावणारी आहे असे समजण्यात येईल. आय. सी. एस्. अधिकाऱ्यांना आपल्या सेवानिवृत्तीची रक्कम इंग्लंडमध्ये पौंडाच्या चलनात मागण्याचा हक्क असू शकत नाही. पण समजा, त्यांना असा अधिकार आहे असे मानले तरी बदललेल्या परिस्थितीत तो कायम राहिला आहे असे म्हणता येणार नाही. भारतात सत्तांतर झाल्यावर आणि नवी घटना अमलात आल्यानंतर सर्वच परिस्थिती फार वेगळी झालेली आहे. ह्या नव्या परिस्थितीत आय. सी. एस्. अधिकाऱ्यांचा असलेला मानवी हक्क नष्ट झालेला आहे असेच मानणे सयुक्तीक ठरणार आहे.

---

## संगीत जलशाची १·७ कोटी डॉलर्स रक्कम निर्वासितांना

बांगला देशात पश्चिम पाकिस्तानच्या लष्करी अत्याचारामुळे कोट्यवधी लोक निर्वासित झाले. त्यांच्या मदतीचा मुख्य भार भारतालाच सोसावा लागला. बंगाली संगीताची एक विशिष्ट पद्धत भारतीय संगीतात मानाचे स्थान पटकावून आहे. तेव्हा संगीत कलाकारांनी निर्वासितांना देऊ केलेली मदत औचित्यपूर्णच म्हटली पाहिजे. हिंदचे प्रसिद्ध सतारीये रविशंकर ह्यांनी एका अमेरिकन कलाकाराच्या मदतीने अमेरिकेत मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये संगीताचा एक संयुक्त कार्यक्रम केला होता. अमेरिकेत बांगला निर्वासितांसंबंधी सहानुभूती बाळगणारे अनेक गायक कलाकार आहेत. त्यांनीही ह्या कार्यक्रमाचा पुरस्कार केलेला होता. कार्यक्रम अतिशय यशस्वी झाला आणि त्यांच्या खास ध्वनिमुद्रिकाही त्याचवेळी मुद्रित करण्यात आल्या होत्या. ध्वनिमुद्रितांच्या विक्रीच्या पोटी अमेरिकेत १·७ कोटी डॉलर्स गोळा झाले आहेत. ही रक्कम बांगला देशातील निर्वासितांसाठी कशी वापरावी ह्याविषयी रविशंकर हे पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी ह्यांचा सल्ला घेणार आहेत. त्यांच्या आदेशाप्रमाणे रकमेचा विनियोग करण्यात येईल. पैशाचा उपयोग योग्य तऱ्हेने व्हावा म्हणून रविशंकर ह्यांनी आपल्या अमेरिकन सहकाऱ्याच्या मदतीने एक फौंडेशन स्थापन केलेले आहे. जलशाच्या तीन ध्वनिमुद्रितांची किंमत १२·९८ डॉलर्स ठेवण्यात आलेली आहे. ध्वनिमुद्रितांवर एक छाया-चित्र छापण्यात आले आहे. चित्रात एक निर्वासित लहान मूल आपल्यासमोर रिकामा वाडगा घेऊन बसले आहे असे हृदय हेलावून सोडणारे दृश्य दाखविण्यात आले आहे. शिवाय सोबत रविशंकर ह्यांनी लिहिलेले बांगला देशातील घटनांची करुण कहाणी सांगणारे एक पत्रकही देण्यात येते. त्याचाही चांगला परिणाम होतो.

---

## टपाल पोचविण्याची पाकिस्तानची विनंती

पाकिस्तानमधील नागरिकांनी बांगला देशामधील आपल्या नातलगांना आणि भारताने पकडलेल्या युद्धबंद्यांना सुमारे ५ लाखावर पत्रे लिहिली आहेत. परंतु बांगला देशाशी त्याचे संबंध संपल्याने ही पत्रे ज्यांच्या नावाने ती लिहिली आहेत त्यांना मिळण्याची शक्यता दुरावली आहे. ह्या परिस्थितीत भारताने ह्या पत्रांचा बटवडा करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती पाकिस्तान सरकारने केली आहे आणि ही विनंतीही बेहरिन बेटातील एका छोट्या राज्यामार्फत भारताकडे आली आहे. पाकिस्तान सरकारच्या डायरेक्टर जनरल ऑफ पोस्टस् ह्याने ती केली आहे. विनंतीचा भारत सरकार विचार करीत असून बांगला देश सरकारकडेही त्याबद्दल विचारणा करण्यात आली आहे. बांगला देशाच्या सरकारशी विचारविनिमय करून भारत सरकार विनंती मान्य करील असा संभव आहे. पश्चिम पाकिस्तानच्या नागरिकांच्या बांगला देशामधील नागरिकांची व युद्धबंद्यांची काहीच बातमी युद्धबंदीनंतर पाकिस्तानात कळलेली नाही. त्यामुळे तेथील नागरिक सरकारवर दडपण आणू लागले आहेत. अर्थातच पाकिस्तान सरकार भारताकडून होकार येण्याची वाट अतिशय आतुरतेने पाहात आहे. पाकिस्तानमधील पोस्ट ऑफिसात हजारो पाकिस्तानी नागरिक पत्रांचे काय झाले म्हणून पृच्छा करीत आहेत. भारताने ढक्क्यात पकडलेल्या ९० हजार युद्धकैद्यांचे नातलग तर फारच अस्वस्थ झाले असून सरकारविरोधी भावना भडकण्यास त्यामुळे मदत होण्याची शक्यता आहे. त्याशिवाय पाकिस्तानमधील कंपन्या आणि व्यापारी टपालाच्या सवलती पुन्हा चालू होण्याची वाट पाहात आहेत. एका काळी पूर्व बंगालमध्ये असलेल्या आपल्या मालमत्तेची त्यांना चिंता वाटून राहिली आहे.

---

## विदर्भातील सहकारी पत पुरवठा

### ठेवी वाढीसाठी भगीरथ प्रयत्नांची आवश्यकता

( महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. चे कार्यकारी संचालक, श्री. वा. चु. श्रीश्रीमाळ ह्यांचे अकोला जिल्ह्यातील सहकारी कार्यकर्त्यांच्या परिषदेतील भाषण )

विदर्भातील पतपुरवठा व खरेदी-विक्री व्यवस्थेबाबतची धोरणे व यंत्रणा यांच्या फेररचनेचे प्रयत्न होत आहेत, ही गोष्ट खचितच स्वागतार्ह आहे. विदर्भातील सहकारी कार्यकर्त्यांनी याबाबत जबाबदारी स्वीकारून उत्साहाने हे काम अंगावर घेतले त्यामुळे गेल्या दहा वर्षात विदर्भातील जिल्हा बँकांची खूपच प्रगती होऊ शकली हे नाकबूल करता येणार नाही. त्यांच्या या काळातील व्यवहारवाढीची कल्पना खालील आंकड्यावरून येईल.

रु. लाखात

| | | भांडवल व निधी | ठेवी | एकूण खेळते भांडवल | दिलेली कर्जे |
|---|---|---|---|---|---|
| अकोला | १९६१ | ४७ | ९३ | २१५ | १६८ |
| | १९७१ | १२८ | ३९९ | ७९३ | ५९२ |
| अमरावती | १९६१ | ३७ | ६१ | २०९ | १५० |
| | १९७१ | १३२ | ३८६ | ८६९ | ७०९ |
| भंडारा | १९६१ | ३९ | २६ | १७९ | १४९ |
| | १९७१ | ९६ | २३० | ४०३ | २७७ |
| बुलढाणा | १९६१ | ३६ | ६० | २०९ | १४६ |
| | १९७१ | २०७ | ३२२ | ७८१ | ६३९ |
| चांदा | १९६१ | ४१ | ४० | १९६ | १५५ |
| | १९७१ | ७६ | २३० | ३८४ | २६२ |
| नागपूर | १९६१ | २७ | ३९ | १६४ | १३८ |
| | १९७१ | ८७ | २१४ | ४९१ | ३८४ |
| वर्धा | १९६१ | १२ | २६ | ७४ | ५६ |
| | १९७१ | ६९ | १३१ | ३४४ | २८३ |
| यवतमाळ | १९६१ | ३९ | ४१ | १६९ | १०४ |
| | १९७१ | १६७ | २९१ | ९२० | ७६१ |
| एकूण | १९६१ | २८२ | ३८८ | १४१७ | १०७६ |
| | १९७१ | ९६५ | २१८५ | ४९८८ | ३९१२ |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येईल की, विदर्भातल्या सर्व जिल्हा बँकांची येणे कर्जे दहा वर्षात चारपट झाली, ( रु. १०·७६ कोटीवरून रु. ३९·१२ कोटी ), भांडवल निधींच्या रकमेतही साधारणपणे याच प्रमाणात वाढ झाली. ठेवींची रक्कम मात्र रु. ३.८८ कोटीवरून रु. २१.८५ कोटी म्हणजे साडेपाचपट झाली. दहा वर्षाच्या कालखंडात यवतमाळ बँकेने दिलेली कर्जे सात पट झाली तर बुलढाणा व वर्धा या बँकांत ती सुमारे साडेचार ते पाचपट झाली. यवतमाळ बँकेने सर्वात अधिक म्हणजे साडेसात कोटींहून अधिक रुपयांचे कर्जवाटप केले होते. सर्वात जास्त ठेवी जमविण्याचा मान अकोला व अमरावती बँकांनी मिळविला. या दोन्ही बँकांकडील ठेवी प्रत्येकी चार कोटींच्या आसपास होत्या. अकोला बँकेच्या ठेवी दहा वर्षात चारपट. झाल्या तर नागपूर वर्धा व चांदा बँकांच्या पाच ते साडेपाचपट आणि अमरावती बँकेच्या ठेवी सहापट झाल्या. यवतमाळ बँकेच्या ठेवी सातपट झाल्या तर भंडारा बँकेकडील ठेवी या काळात साडेआठपट झाल्या.

### शेतीव्यतिरिक्त कर्जव्यवहार मर्यादित

वरीलप्रमाणे गेल्या दहा वर्षात विदर्भातल्या जिल्हा बँकांच्या व्यवहारात वाढ जरी आकर्षक दिसत असली तरी सहकारी व्यवहारांचा निरनिराळ्या क्षेत्रांतील विस्तार मात्र अजून फारसा झालेला दिसत नाही. १९६१ नंतर राज्य बँकेने प्रक्रिया व इतर औद्योगिक सहकारी संस्थांना चालना देण्याबाबत या भागातही प्रयत्न केले. पण अजून तरी विदर्भातल्या जिल्हा बँकांचे शेती व्यतिरिक्त इतर कर्जव्यवहार मर्यादितच राहिले आहेत. हे खालील माहितीवरून दिसून येईल.

( रुपये लाखांत )

| | ३०–६–१९७१ रोजी येणे कर्ज | | |
|---|---|---|---|
| | एकूण कर्ज | पैकी बिगर-शेतीकर्जे | प्रमाण |
| ( १ ) कोकण ( ३ बँका ) | ७४६·९४ | ३६८·६१ | ४९ टक्के |
| ( २ ) पश्चिम महाराष्ट्र ( ९ बँका ) | ९२५२·१८ | २८४०·३८ | ३१ टक्के |
| ( ३ ) विदर्भ ( ८ बँका ) | ३९१२·५४ | ५०५·४० | १३ टक्के |
| ( ४ ) मराठवाडा ( ५ बँका ) | ३६६४·६० | २८१·०५ | ३ टक्के |
| एकूण | १७५७६·२६ | ३९९५·४४ | २२ टक्के |

वरील आकडेवारीवरून स्पष्टपणे दिसून येईल की, कोकण व पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने विदर्भ व मराठवाडा या दोन्ही विभागातल्या बँकांनी शेती कर्जाव्यतिरिक्त इतर व्यवहारासाठी दिलेली कर्जे अतिशय अल्प होती. विदर्भात हे प्रमाण सुमारे १३ टक्के होते, तर पश्चिम महाराष्ट्रात सुमारे ३१ टक्के होते. कोकणातील बँकांनी तर जवळ जवळ शेतीकर्जाइतकेच बिगर-शेती कर्ज वाटले आहे.

### भौगोलिक परिस्थितीतला फरक

कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी मागेच म्हटल्याप्रमाणे निरनिराळ्या विभागातील भौगोलिक परिस्थितीतला फरक या संदर्भात ध्यानात घ्यायला हवा. पश्चिम महाराष्ट्रातल्या प्रगतीचे विवेचन करताना ते म्हणतात, " पश्चिम महाराष्ट्रात बागायती पिके ही एकंदर कृषिव्यवहारात विदर्भाच्या मानाने जास्त महत्त्वाची

व ज्वारी, दिकाचे महत्त्वहि पश्चिम महाराष्ट्रात अधिक. यामुळे पीक कर्जाची कल्पना पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी व्यवहारात विशेषत: आवश्यक व महत्त्वाची ठरली. विदर्भाची शेती मुख्यत: पावसावरी पिकाची, यामुळे पीक-कर्ज पद्धतीचा पाठपुरावा येथे अनावश्यक वाटल्यास आश्चर्य नाही." विदर्भात पीक-कर्ज पद्धतीची सुरुवातच मुळी १९५६ नंतर झाली आणि तिचे महत्त्व व परिणामकारकता सहकारी कार्यकर्त्यांना पूर्णपणे पटायलाही काही काळ जावा लागला.

### महत्त्वाच्या समस्या

विदर्भातील जिल्हा बँकांपुढे सर्वसामान्यत: आज महत्त्वाच्या दोन समस्या आहेत. एक वाढत्या थकबाकीची. दुसरी म्हणजे अपुऱ्या ठेवी वाढीची. थकबाकीमुळे शेतकऱ्यांना नवीन कर्ज-पुरवठा बंद होतो आणि याचा कृषीउत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो. अशा वेळी बँकेकडे ठेवी भरपूर असल्या तर ती जिल्हा बँक थकबाकी सामावून घेऊन इतर व्यवहारांना कर्जपुरवठा चालू ठेवू शकते. मात्र ठेवींची रक्कमच मर्यादित असेल तर वाढत्या थकबाकीमुळे बँकेचा सर्व व्यवहार धोक्यात येतो. अशा तऱ्हेने हे दोन प्रश्न एकमेकांशी निगडित आहेत.

### वाढती थकबाकी

विदर्भातील बहुतांश शेती ही पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे नापिकीची तलवार शेतकऱ्याच्या डोक्यावर सतत टांगती असते. तरीही सध्याच्या थकबाकीच्या फुगण्याची सुरुवात साधारणत: १९६५–६६ साली झाली असे मानायला हरकत नाही. गेल्या वर्षी तर याचा कळसच झाला. आठांपैकी सहा जिल्ह्यांत सार्वत्रिक नापिकीची परिस्थिती निर्माण झाली. उरलेल्या दोन म्हणजे चांदा व भंडारा जिल्ह्यातील काही भाग नापिकीचा होता. तरीही राज्य बँक व जिल्हा बँका यांच्या प्रयत्नांमुळे रूपांतराच्या सवलतीचा फायदा घेऊन या संकटातून वेळ निभावून नेणे शक्य झाले.

थकबाकीमुळे राज्यातल्या आणि विदर्भातल्याही काही बँकांवरील आर्थिक ताण वाढत आहे. त्यासाठी खास योजना कार्यान्वित करून त्यांच्या एकूण व्यवहाराला इष्ट ते वळण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज अडचणीत नसलेल्या बँकांनीही यापासून बोध घेऊन सावध व्हायला हवे. आपले व्यवहार कुवतीबाहेर जाणार नाहीत याची काळजी घ्यायला हवी. सर्वच बँकांनी कर्जव्यवहाराबाबत, विशेषत: वसुलीबाबत कडक धोरण स्वीकारून कसोशीचे प्रयत्न केले तर या बँकांच्या अडचणी बऱ्याच अंशी दूर होऊ शकतील.

### ठेवीवाढीसाठी भगीरथ प्रयत्न हवेत

उपलब्ध साधनसंपत्ती आणि कर्जमागणी याचा समतोल बिघडू न देणे हे बँकेचे मर्म होय. यासाठी कर्जधोरणाची काळजीपूर्वक आखणी करावी लागते. तसेच थकबाकीतही पैसा अडकून पडणार नाही याची दक्षता घ्यावी लागते. मात्र एवढ्याने काम भागत नाही. वाढते व्यवहार पेलण्याची स्वत:ची ताकद वाढविण्यासाठी म्हणून ठेवीवाढीचे प्रयत्न करायला हवे. ठेवींची रक्कम मोठी असेल तर प्रसंगोपात उद्‌भवणारी थकबाकी पेलण्याचे बँकेचे सामर्थ्य वाढते.

विदर्भातल्या जिल्हा बँकांनी या दृष्टीने खूपच प्रयत्न करावयास हवेत. विशेषत: व्यापारी बँका आता ग्रामीण भागात शाखा उघडू लागल्यामुळे त्या बँकांच्या पाठी असलेले प्रसिद्धीचे वलय ध्यानात घेऊन आपणास ठेवीवाढीसाठी किती भगीरथ प्रयत्न करावे लागतील याची कल्पना असावी. जून १९७१ अखेर विदर्भातल्या आठ बँकांकडील ठेवी जवळ जवळ २२ कोटी रुपये होत्या. याउलट मराठवाड्यातल्या पाच बँकांकडे सुमारे १६ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. ठेवीवाढीच्या दृष्टीने शाखा-विस्तार करायला विदर्भात अद्याप खूपच वाव आहे. विदर्भातल्या आठही बँकांच्या सप्टेंबर १९७१ अखेर फक्त १९० शाखा होत्या. सप्टेंबर १९७२ पर्यंतच्या दोन वर्षांत ४९ नवीन शाखा उघडण्याचा कार्यक्रम विदर्भातल्या जिल्हा बँकांनी स्वीकारला होता. आता-पर्यंतच्या वर्ष-सव्वावर्षाच्या काळात त्यातल्या फक्त चारच शाखा प्रत्यक्षात कार्यान्वित झाल्या ही गोष्ट स्पृहणीय कशी मानावी? जिल्हा बँकांनी शाखा-विस्तार आणि त्याचबरोबर ठेवीवाढीच्या नव्या नव्या आकर्षक योजना कार्यान्वित करून ठेवी वाढविण्याचे प्रयत्न तातडीने सुरू करावे हे मी आवर्जून या प्रसंगी सांगू इच्छितो. वाढत्या कर्जव्यवहारासाठी बाहेरून कोठे कर्ज मिळविण्यासाठीही स्वत:चे भांडवल व ठेवींची पुंजी पायाभूत मानली जाते ही गोष्ट दुर्लक्षून चालणार नाही.

---

**पुणे शहरातील आत्महत्या** — १९७१ मध्ये ५५४ जणांनी आत्महत्येचा प्रयत्न केला; १९७० मध्ये ३१५ जणांनी असा प्रयत्न केला होता. प्रत्यक्ष आत्महत्या २०३ घडून आल्या; १९७० मध्ये त्यांची संख्या १०५ होती. १९७१ मध्ये आत्म-हत्येच्या प्रयत्नांपैकी २५४ प्रयत्नांचे कारण कौटुंबिक अडचणी हे होते. ८ पुरुष आणि ८ स्त्रिया ह्यांनी प्रेमातील वैफल्यामुळे आत्महत्येचा प्रयत्न केला, पण ते सर्व जगले.

**वाढदिवस समारंभावर १८ लक्ष रु. खर्च** — रीज पॅले हा फ्रेंच कोट्याधीशाने न्यूयॉर्कहून ७२५ मित्रांना विमानाने पॅरिसला आणले आणि त्यांच्यावर १८,२५,००० रुपये खर्चून आपला ५० वा वाढदिवस साजरा केला. 'मला काही अक्कल असती, तर मला याची लाज वाटली असती' असे त्यानेच जाहीर केले!

**सारस्वत बँकेची १४ वी शाखा** — सारस्वत को-बँकेने आपली १४ वी शाखा जुहू (मुंबई) येथे उघडली. बँकेकडील ठेवी आता ९ कोटी रु.चेवर गेल्या आहेत.

## मदतीशिवाय भारत प्रगती करू शकेल

म्हैसूर सिमेन्ट्स कंपनीच्या वार्षिक सभेत बोलताना उद्योगपती श्री. जी. डी. बिर्ला म्हणाले की भारताला मिळणारी अगर मिळालेली परदेशांची मदत म्हणजे एक प्रकारचा शापच म्हटला पाहिजे. देशाला परदेशांच्या मदतीची कुबडी घेऊन नेहमीच वाटचाल करता येणार नाही. अमेरिकेने भारताची मदत बंद केली आहे. त्यामुळे काही अडचणी सोसाव्या लागतील हे खरे. परंतु भारताजवळ बुद्धी, माणुसबळ आणि लोकशाही राज्यपद्धती ह्या गोष्टी आहेत. त्यांच्या आधाराने भारत स्वतःच्या पायावर प्रगती करू शकेल. भारताचे मदतीशिवाय चालू शकेल, मदतीशिवाय तो उभा राहू शकेल; इतकेच काय पण प्रगतीपथावर वाटचालही करू शकेल. परदेशांकडून मिळणारी मदत जितकी लवकर बंद होईल तितकी चांगली. परदेशी मदत ही डोकेदुखीवर घेण्यात येणाऱ्या अस्प्रोसारखी आहे. ती एकाएकी मदत बंद झाली तर काही काळपर्यंत कसेसेच वाटेल. परंतु अखेर देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यामुळे आरोग्याचाच लाभ होईल. भारतामधील उद्योगधंद्यांचा पाया बळकट होता. अशा पायामुळेच देश बलवान होतो. हा पाया अधिक मजबूत करता येणे शक्य आहे. सरकार ही गोष्ट लक्षात घेईल आणि पाया मजबूत करण्यास प्राधान्य देईल अशी आशा आहे. बळकट औद्योगिक पायामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेगही झपाट्याने वाढू लागेल. पाकिस्तानशी झालेले युद्ध भारताने १४ दिवसांत जिंकले. हा एक चमत्कारच म्हटला पाहिजे व जवानांचे कृतज्ञ राहिले पाहिजे. भारत हा एक दुर्बल देश आहे अशी समजूत परदेशात पसरलेली होती. पण युद्धातील विजयामुळे ही समजूत चुकीची असल्याचे सिद्ध होऊन भारताची प्रतिष्ठा जगात उंचावली आहे.

---

## परदेशी वस्तूंची श्रीमंतांना भलतीच हाव

परदेशातून आयात केलेल्या वस्तू घरात असणे म्हणजे प्रतिष्ठेचे लक्षण मानले गेले आहे. समाजात आपण कोणीतरी विशेष आहो हे दाखविण्याचा तो एक मार्गच होऊन बसला आहे. विशेषतः श्रीमंत झालेल्या लोकांत ही वृत्ती प्रामुख्याने आढळून येते. नव्याने आयात केलेल्या परदेशी वस्तू चोरबाजारात तर मिळतातच. पण दिल्ली शहरात ह्या वस्तू मिळविण्याचा एक राजरोस मार्ग आहे. तो म्हणजे परदेशी वकिलातीमधून होणारे जुन्या सामानाचे लिलाव. लिलावात बोली बोलून अनेक प्रकारच्या चैनीच्या वस्तू घेण्याचे वेड तेथे खूपच पसरलेले आहे. आता वेड म्हटले की त्याच्या भरात काही हास्यास्पद प्रकार होणारच. दिल्लीमधील एका परदेशी वकिलातीच्या आवारात नुकताच एक लिलाव झाला. लिलावाला गर्दी खूपच होती. एक श्रीमंत बाई तेथे आली होती. लिलाव होता जुन्या अंतरवस्त्रांचा. पण बाईने तो हातचा सोडला नाही. अशा जुन्या वस्त्रांचा एक ढीगचा ढीग तिने खरेदी केला. तथापि वकिलातीमधील सामानाचे लिलाव नेहमीच होत नाहीत. परदेशी मालाच्या मोहात सापडणाऱ्या लोकांची हौस पुरविणारी अनेक दुकाने राजधानीत निघाली आहेत. दुकानात बऱ्याच वेळा परदेशी वकिलातीतून घेतलेला माल दिसून येतो. दुकानाच्या मालकांना बहुधा आतली माहिती असते. लिलावाच्या वेळी ते अगर त्यांचे हस्तक खूप पैसे घेऊन येतात आणि इतरांपेक्षा अधिक किंमत चढवून वस्तू खरेदी करतात. त्या वस्तूत टेलिव्हिजन सेटस्, ट्रॅन्झिस्टर्स, कॅमेरे, टेप रेकॉर्डर्स, इत्यादी माल असतो. शिवाय वृत्तपत्रात येणाऱ्या परदेशी मालाच्या विक्रीच्या जाहिरातीवरही त्यांची नजर असते. भारतात अलीकडे हिप्पींचा सुळसुळाट झाला आहे. हे परदेशी तरुण काही वेळा पैशाच्या अडचणीत सापडतात आणि मग आपल्याजवळील वस्तू विकण्यास प्रवृत्त होतात. त्याही बाजारात येतात.

---

## भारत युगोस्लाव्हियाची ८ कोटींची भरपाई करणार

१९६७ मध्ये ग्रेटब्रिटनने पौंडाचे अवमूल्यन केले, तशी भारत सरकारने युगोस्लाव्हियाच्या देण्यात १२.५% कपात केली. भारत आणि युगोस्लाव्हिया ह्यांच्यातील करार पौंडाशी निगडित होता; पौंडाच्या अवमूल्यनामुळे त्याची रुपयांतील किंमत बदलली. त्याकारणाने रुपयांतील देण्याघेण्याचे भारताचे करारही बदलले पाहिजेत, असे भारत सरकारने त्या कपातीचे समर्थन केले. भारताने युगोस्लाव्हियाशी विचारविनिमय न करताच ही कपात केली, त्यामुळे युगोस्लाव्हियाचे सरकार नाराज झाले. अखेर इंटरनॅशनल मोनेटरी फंडाकडे विचारणा करण्यात आली, आणि फंडाने जिनिव्हाच्या एका कायदेपंडिताकडे हा प्रश्न सोपविला. त्याने आपला निवाडा जाहीर केला आहे. त्याप्रमाणे भारताने युगोस्लाव्हियाची ९ कोटी रुपयांची भरपाई करावयाची आहे.

---

## दररोज नव्या १३९ बँक शाखा निघणार

भारतातील बँकांनी १९७४ अखेर ५,००० नव्या शाखा उघडल्या पाहिजेत, असे रिझर्व्ह बँकेने ठरविले आहे. ह्याचा अर्थ, दरमहा १३९ नव्या शाखा उघडल्या गेल्या पाहिजेत. जून, १९६९ ते ऑक्टोबर, १९७१ ह्या मुदतीत नव्या शाखा दरमहा १४४ ह्या गतीने उघडण्यात आल्या होत्या. ही नवी ५,००० गावे शोधून काढणे मोठा अवघड प्रश्न आहे; कारण बँकिंगची वाढ होऊ शकेल अशा बहुतेक गावी आधीच शाखा उघडून झाल्या आहेत. शाखांच्या ह्या जाळ्यावर मुख्य कचेरीची प्रभावी देखरेख कशी राहील हाही प्रश्न आहे.

---

## जवानांच्या कुटुंबीयांना बँक-नोकरीत प्राधान्य

जवानांच्या कुटुंबीयांस बँक नोकरीत प्राधान्य देण्यात येत आहे. शैक्षणिक पात्रतेची अट सैल करून त्यांच्यासाठी काही प्रमाणात कारकुनी व कनिष्ठ नोकऱ्या राखून ठेवल्या जातील, असे इंडियन बँक्स असोसिएशनने जाहीर केले आहे.

**अभिव्यक्ति श्री. चिं. वि. जोग व्यक्तिदर्शन विशेषांक (संपादक: सौ. वृंदा पाध्ये, मुंबई. पृ. सं. १३२ मूल्य २ रुपये.)**

२५ जानेवारी, १९७२ रोजी महाराष्ट्र बँकेचे कस्टोडिअन श्री. चिं. वि. जोग ह्यांच्या वयास ६० वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्त प्रस्तुत विशेषांक प्रसिद्ध करण्यात आला आहे. महाराष्ट्र बँकमध्ये मॅनेजर म्हणून १९४३ साली ते दाखल झाले आणि कित्येक संस्थापक मालक निवृत्त झाले तरी श्री. जोग ह्यांनी त्यांची उणीव भरून काढली, इतकेच नव्हे तर महाराष्ट्र बँक ही जोगांची बँक बनली! धोरण ठरविणे आणि त्या धोरणाची अंमलबजावणी करणे ह्या दोन्ही बाबतीत श्री. जोगांचे नेतृत्व अत्यंत यशस्वी झाले आहे, फक्त अंमलबजावणी करण्यातच ते तज्ज्ञ असते, तर महाराष्ट्र बँकेची एवढी प्रगती झालीच नसती. कुणालाही न खुपणारे परंतु सर्वांच्यावर प्रभाव पाडणारे, अशा आदरणीय शीतल व्यक्तिमत्वामुळे भागधारक, ठेवीदार, संचालक, कर्मचारी, कर्जदार ह्या सर्वांचा त्यांनी विश्वास संपादन केलेला आहे. 'अभिव्यक्ति'ने हा विशेषांक काढून श्री. जोग ह्यांच्या कामगिरीचा उत्कृष्ट परिचय कित्येक जाणकार लेखकांचे करवी करून दिला आहे. श्री. जोग ह्यांना ह्या शुभप्रसंगी आम्ही निरामय दीर्घ आयुष्य चिंतितो. एक निष्ठावंत व्यक्तीसुद्धा केवढे मोठे प्रभावी कार्य करू शकते, ह्याचा श्री. जोग हा उत्कृष्ट आदर्श आहे.

---

### बेकारी दूर करण्यासाठी जादा सेस

हिंदमधील बेकारीचा प्रश्न सतत उग्र होत चालला आहे. प्रश्न सोडविण्यासाठी अनेक सूचना करण्यात येत असतात. ग्रामीण भागातील बेकारीवर उपाय म्हणून सरकारने काही तातडीच्या योजना हाती घेतल्या आहेत. परंतु त्यांना यावा तसा वेग अनेक कारणांनी येत नाही असा अनुभव येत आहे. बेकारी दूर करण्यासाठी मुख्य अडचण येते ती पैशाची. बेकारी हटविण्याच्या योजनांना लागणारा पैसा कसा गोळा करावा ह्याविषयी भारत सरकार कसोशीने विचार करीत आहे. सध्या तज्ज्ञांचे एक मंडळ ह्या विषयासंबंधी अहवाल तयार करण्यात गुंतले आहे. बेकारी घालविण्यासाठी प्राप्तीवरील कर आणि कॉर्पोरेशन कर ह्यात जादा सेसची भर घालण्याची सूचना करण्यात येण्याची शक्यता आहे. सूचना सरकारतर्फे तज्ज्ञांच्या मंडळापुढे ठेवण्यात येणार आहे. ती मान्य झाल्यास सरकारला अधिक पैसा उपलब्ध होईल.

---

**भारतातील सर्वात उंच निऑन साइन** — मुंबई येथील नरिमन पॉइंटवरील एअर इंडियाच्या इमारतीवर एअर इंडियाने बसविलेली फिरती निऑन साइन ही भारतातील सर्वांत मोठी फिरती निऑन साइन आहे. तिचा व्यास २२ फूट असून २२ फूटी उंच कॉंक्रीटच्या पायावर ती उभारलेली आहे. जमिनीपासून तिची उंची ३९१ फूट, ५ इंच आहे.


(मावळा सातारा)



# नाण्याला तीन बाजू असतात...

दोन नेहमीच्याच आणि तिसरी बाजू परीघ (जाडी)

युनायटेड वेस्टर्न बँकेत रक्कम गुंतविल्याने नाण्याचा परीघ वाढतो म्हणजेच रकमेत वाढ होते. आकर्षक व्याज दराच्या गरजेनरूप विविध ठेव योजना.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कचेरी: चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.

स्थापना: १९३६ — महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा — शेड्युल्ड बँक

**वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झीक्युटर कंपनी लि.**

बँकेच्या या सलग्न संस्थेमार्फत विश्वस्त निधी व व्यवस्थापनाची कामे केली जातात

# ओगले

## प्रभाकर कंदील

- अंधाऱ्या रात्री,
- वादळी वाऱ्यात,
- ओबड-धोबड रस्त्यावर,
- खवळलेल्या दर्यावर

**मार्गदर्शक व विश्वसनीय.**

तयार करणार

**ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड**

ओगलेवाडी (जि. सातारा)

## दरडोई उत्पन्नात भारताचा २२ वा अनुक्रम

जागतिक बँकेने विकसनशील देशांतील आर्थिक विकासाची दिशा दाखविणारा एक अहवाल तयार केला आहे. विकसनशील देशांच्या आजच्या अवस्थेबद्दल अहवालात उपयुक्त माहिती देण्यात आली आहे. अहवालातील माहितीप्रमाणे आशिआ खंडातील १५ विकसनशील देशांचे दरडोई राष्ट्रीय ठोक उत्पन्न १९६९ साली अवघे १०९ डॉलर्स होते. विकसनशील देशांत ह्या बाबतीत आशिआतील देशांचा सर्वात खाली अनुक्रम लागतो. आफ्रिकेतील ६१ देशांचे दरडोई ठोक राष्ट्रीय उत्पन्न १२३ डॉलर्स आहे. मध्यमपूर्व अथवा पश्चिम आशिआ ह्या भागातील उत्पन्न ३४९ डॉलर्स आहे. दक्षिण युरोपमधील विकसनशील देशांचे ठोक राष्ट्रीय उत्पन्न सर्वात अधिक म्हणजे ४९६ डॉलर्स आहे. ह्या बाबतीत देशांचा अनुक्रम लावण्यास लागले तर २७ विकसनशील देशांत भारताचा क्रम २२ वा लागतो भारताचे दरडोई ठोक राष्ट्रीय उत्पन्न अवघे ९३ डॉलर्स आहे. पाकिस्तान आणि ब्रह्मदेश ह्या दोन देशाचे राष्ट्रीय ठोक उत्पन्न ते भारतापेक्षा कमी आहे. पाकिस्तानचे उत्पन्न ८९ डॉलर्स आणि ब्रह्मदेशाचे ६५ डॉलर्स आहे. आशिया खंडात मलेशिआचे दरडोई राष्ट्रीय ठोक उत्पन्न सर्वात अधिक म्हणजे २९१ डॉलर्स आहे. दक्षिण युरोपात इस्राइलचे सर्वात अधिक म्हणजे १३५१ डॉलर्स आहे. दक्षिण अमेरिकेत व्हेनेझुएलाचे उत्पादन सर्वात अधिक म्हणजे ८४१ डॉलर्स आहे. आफ्रिकेत झांबिआचे सर्वात अधिक म्हणजे २१६ डॉलर्स आहे. विकसित देशांत सर्वात अधिक उत्पन्न अर्थातच अमेरिकेचे आहे. त्यानंतर कॅनडा, प. जर्मनी, ब्रिटन, जपान व इटाली ह्या देशांचे अनुक्रम लागतात. तरीसुद्धा एकूण राष्ट्रीय उत्पन्नात भारताचा अनुक्रम आशिआत तिसरा लागतो. जपानचा पहिला व चीनचा दुसरा लागतो.

---

## दोन वर्षांत बेकार एंजिनिअर दिसणार नाही

नियोजित अर्थव्यवस्थेचा उद्देश साधनसामग्रीचा जास्तीत जास्त चांगला उपयोग करून उत्पादन वाढविण्याचा असतो. साधनसामग्री ह्या कल्पनेत मनुष्यबळाचा अंतर्भाव ही अर्थात आलाच. तेव्हा श्रम करण्यास तयार असणाऱ्या माणसाला काम करण्याची संधी मिळत नसेल तर ती उपलब्ध श्रमशक्तीचा अपव्ययच समजला पाहिजे. त्यातही भारतासारख्या तांत्रिक दृष्ट्या मागासलेल्या देशात शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, इत्यादींची बेकारी तर अनाकलनीयच वाटण्यास हवी. पण आज भारतात अनेक तंत्रज्ञ व शास्त्रज्ञ बेकार आहेत ही वस्तुस्थिती आहे. भारताचे नियोजनमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनी विशाखापट्टम येथे बोलताना ह्यासंबंधी आशादायक आत्मविश्वास व्यक्त केला आहे. ते म्हणाले की आतापासून दोन वर्षांच्या अवधीत देशात एकही एंजिनिअर अगर शास्त्रज्ञ बेकार असलेला दिसणार नाही. बेकारीच्या प्रश्नाबद्दल सरकारच्याही काही चुकीच्या कल्पना होत्या. देशातील ठोक राष्ट्रीय उत्पन्न वाढत गेले तर इतर सर्वच समस्या आपोआप सुटत जातील अशी कल्पना करून घेण्यात आली होती. पण, ती चुकीची ठरली. ह्या अनुभवापासून बोध घेऊन नियोजनाच्या पद्धतीला आता नवीन दिशा देण्यात येत आहे. देशात मोठ्या प्रमाणावर बेकारी थैमान घालीत असताना सामाजिक न्यायाची कल्पना करणे सुद्धा चुकीचे ठरेल. बेकारीला मुख्यतः दोन कारणे आहेत. साधनसामग्रीचा उपयोग अनुत्पादक खर्चाकडे करण्यात आल्याने बेकारीचा उद्भव झालेला आहे. शिवाय १९६६ साली पडलेला अभूतपूर्व दुष्काळही त्याला कारण आहे. संरक्षणावर करण्यात येणारा खर्च प्रमाणाबाहेर आहे असे वाटण्याचा संभव आहे. पण नुकताच मिळालेला विजय १९६२ पासून संरक्षणाची तयारी केल्याशिवाय प्राप्त झाला नसता.

---

## कुटुंबनियोजन फक्त बंगालयांसाठी

पाकिस्तान सरकारकडून पूर्व पाकिस्तानला फक्त कुटुंब-नियोजनाच्या कार्यक्रमासाठीच पश्चिम पाकिस्तानापेक्षा जास्त रक्कम मिळत होती. पाकिस्तान सरकारने कुटुंबनियोजनासाठी राखून ठेवलेल्या रकमेपैकी ८०% रक्कम पूर्व पाकिस्तानावर खर्च होत असे, असे गेली १० वर्षे चालू होते. पूर्व पाकिस्तानातील लोकांच्या हितासाठी नव्हे तर पश्चिम पाकिस्तानची लोकसंख्या वाढावी पण पूर्व पाकिस्तानची मात्र वाढू नये ह्यासाठी हे धोरण अवलंबिले होते. २५ मार्च, १९७१ नंतर पाकिस्तानी फौजांनी पूर्व पाकिस्तानातील शक्य तेवढे लोक हद्दीबाहेर घालविण्याचे किंवा मारून टाकण्याचे कारणही तेच होते.

---

## रेल्वे वॅगन्सचे उत्पादन आणि निर्यात

रेल्वे वॅगन्स तयार करणाऱ्या १६ कारखान्यांची वार्षिक उत्पादनक्षमता २८,४५९ वॅगन्सची आहे. चवथ्या योजनेत हिंदी रेल्वेज २०,००० वॅगन्स घेणार आहेत. म्हणजे, ५०% उत्पादनक्षमतेस भारतात गिऱ्हाइक आहे. गेली काही वर्षे रेल्वेजनी फारच कमी वॅगन्स घेतल्यामुळे ३२% एवढीच उत्पादन-क्षमता वापरण्यात आली. कारखान्यांनी निर्यातीकडे लक्ष दिले आहे. मार्च, १९७१ अखेर संपलेल्या वर्षी भारतातून १४·२ कोटी रु. च्या वॅगन्स व डबे निर्यात झाले. बर्मा, हंगेरी, थायलँड, इराण, ह्या देशांकडे मोठी निर्यात झाली.

---

## कॉसमॉस बँक सेवक वर्गातर्फे संरक्षण निधीस देणगी

दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणे ३० या बँकेतील सेवकांनी १८ जानेवारी १९७२ रोजी साजऱ्या झालेल्या बँकेच्या ६६ व्या वर्धापनदिनी संरक्षणनिधीस रु. २५१/- देणगी दिली. सदरची रक्कम मा. जिल्हाधिकारी पुणे, यांचेकडे पाठविण्यात आली.

---

BANK TO BANK...

## THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659-60, Raviwar Peth,
BELGAUM

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our Branches – Bombay Office at Mandvi, Bombay – 9.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

**S. Y. KAMAT** — *General Manager.*
**K. B. KIRTIKAR** — *Chairman.*




## GADRE BROTHERS

ENGINEERS & FOUNDERS

MADHAVNAGAR (S. Rly.)

Phone: 318 Sangli
Gram: 'SEWA' Madhavnagar

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| सांपत्तिक स्थिती | | ३०-६-१९७१ रोजी |
|---|---|---|
| १. भांडवल व निधी | रु. | १८८५ लाख |
| २. ठेवी | रु. | ९३३२ लाख |
| ३. कर्जे | रु. | १४१८९ लाख |
| ४. एकूण खेळते भांडवल | रु. | १९५५१ लाख |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिल वसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

**सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक**

डॉ. बा. यु. भीभीमाळ — कार्यकारी संचालक
श्री. वसंतराव दादा पाटील — अध्यक्ष

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी
दूरध्वनी: मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१'अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले — व्यवस्थापक
जी. पी. भावे — कार्यकारी संचालक


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९९५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )